# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १९५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०२ ऑगस्ट २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## मध्यप्रदेशात तोतया हृदयरोगतज्ज्ञामुळे एकाच महिन्यात पाच जणांचे मृत्यू

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- मध्य प्रदेशमध्ये एक धक्कादायक घटना काही दिवसांपूर्वी उघड झाली होती. युकेमधील प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. जॉन कॅम असल्याचे भासवून नरेंद्र विक्रमादित्य यादव नामक तोतयाने दामोह जिल्ह्यातील मिशन रुग्णालयात काही रुग्णांची हाताळणी केली. यादवने जे शेवटचे पाच रुग्ण हाताळले होते, त्या सर्वांचा मृत्यू झाल्याची माहिती मध्य प्रदेश विधानसभेत देण्यात आली आहे. याबाबतचे वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिले आहे. मध्य प्रदेश विधानसभेत सादर केलेल्या माहितीनुसार, नरेंद्र यादव याने आपली ओळख लपवून काही रुग्णांची अँजिओप्लास्टी केली होती. २ जानेवारी ते ११ फेब्रुवारी दरम्यान दामोह जिल्ह्यातील मिशन रुग्णालयात त्याने १२ शस्त्रक्रिया केल्या होत्या. यापैकी पाच रुग्णांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. दोन रुग्णांवर उपचार सुरू असताना आणि तीन रुग्णांवर उपचार केल्यानंतर मृत्यू झाला, असे द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे. विधानसभेत दिलेल्या माहितीनुसार, यादवकडून अँजिओप्लास्टी केलेले शेवटचे पाच रुग्ण हे ५१ ते ७५ वयोगटातील होते. हे सर्व एका महिन्याच्या कालावधीत एकामागून एक मरण पावले. यामुळे आता यादवची पार्श्वभूमी किंवा त्याची खरी माहिती पडताळता त्याला कामावर कसे ठेवण्यात आले, याबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# भारत-रशिया दोन्ही देश स्थिर भागीदार

## वेळोवेळी एकमेकांच्या बाजूने उभे, डोनाल्ड ट्रम्प यांच्या टीकेनंतर भारताचे प्रत्युत्तर

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर लादल्यानंतर, भारत आणि रशियाच्या संबंधांवर भाष्य केले होते. दोन्ही देशांची अर्थव्यवस्था मृत असल्याची टीका ट्रम्प यांनी केली होती. आता या टीकेला आज भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रत्युत्तर दिले आहे. रणधीर जयस्वाल म्हणाले की, विविध देशांसोबतचे आमचे द्विपक्षीय संबंध स्वतःच्या अटींवर आधारित आहेत. यात कोणत्याही तिसऱ्या देशाच्या नजरेतून पाहू नयेत.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल पुढे म्हणाले, भारत आणि रशिया हे स्थिर भागीदार असून, वेळोवेळी एकमेकांच्या बाजूने उभे आहेत. आमच्या संरक्षण गरजांची पूर्तता पूर्णपणे आमच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक मूल्यांकनाद्वारे निश्चित केली जाते. भारत-अमेरिका भागीदारीत अनेक बदल आणि आव्हाने आली आहेत. आम्ही अमेरिकेसोबत ज्या ठोस अजेंड्यावर वचनबद्ध आहोत, त्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. आम्हाला विश्वास आहे की, अमेरिकेसोबतचे आमचे संबंध पुढे जात राहतील.

इराणसोबत व्यवसाय करणाऱ्या भारतीय कंपन्यांवर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांशी संबंधित प्रश्नांवर रणधीर जयस्वाल म्हणाले, "आम्ही निर्बंधांची दखल घेतली आहे, त्यावर विचार करत आहोत. भारतीय तेल कंपन्यांनी रशियन तेलाचा पुरवठा थांबवल्याच्या वृत्तांनाही त्यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, ऊर्जा पुरवठ्याच्या गरजांबद्दल आमचा दृष्टिकोन सर्वांना माहिती आहे. आम्ही बाजारात उपलब्ध असलेल्या संसाधनांवर आणि सध्याच्या जागतिक (पान ४ वर)

### टॅरिफ लावण्याचा निर्णय एका आठवड्याने पुढे ढकलला

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी भारतावर २५ टक्के कर लागू करण्याची घोषणा केली होती, जी १ ऑगस्टपासून लागू होणार होती. परंतु ट्रम्प यांनी तूर्तास या नवीन कर लागू करण्याच्या निर्णयाला स्वल्पविराम दिला आहे. परिणामी आता भारताला एक आठवड्याचा वेळ मिळाला आहे. भारतासोबतच ७० हून अधिक देशांनाही या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे. व्हाईट हाऊसने माहिती दिली आहे की नवीन कर हा येत्या ७ ऑगस्ट २०२५ पासून लागू होईल.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भरतासह अनेक देशांवर कर लादण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली आहे. नुकताच ट्रम्प यांनी १० ते ४१ टक्क्यांपर्यंतच्या कर लादण्याचा टॅरिफ'अस्त्रा'चा आदेश जारी केला आहे. त्यानुसार ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के, पाकिस्तानवर १९ टक्के, बांगलादेशवर २० टक्के आणि अफगाणिस्तानवर १५ टक्के कर लादला होता. अशाप्रकारे, अनेक देशांचा समावेश टॅरिफच्या यादीत आहे, परंतु आता नवीन कर एका आठवड्यासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. ट्रम्प म्हणतात की नवीन कर अमेरिकेला आर्थिक बळ देईल आणि व्यापार संतुलन देखील निर्माण करेल. या निर्णयामुळे अमेरिकेला आर्थिक सुरक्षा मिळेल आणि वर्षानुवर्षे सुरू असलेला व्यापारातील असमतोलही दूर होईल, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे.

# दौंडच्या यवतमध्ये दोन गटात जातीय तणाव

## आक्षेपार्ह पोस्टनंतर दगडफेक, जाळपोळ; परिस्थिती नियंत्रणात





पुणे दि.१ (प्रतिनिधी)- पुण्याच्या दौंड तालुक्यातील यवत येथे दोन गटांत जातीय तणाव निर्माण झाला आहे. व्हॉट्सॲपवरील एका आक्षेपार्ह पोस्टमुळे हा वाद भडकला. त्यात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवले. सध्या या ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही थेट घटनास्थळी स्थितीचा आढावा घेतला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील यवत गावातील एका समुदायाच्या तरुणाने शुक्रवारी सकाळी सोशल मीडियावर एक आक्षेपार्ह पोस्ट केली. या पोस्टची माहिती मिळताच गावात तणाव निर्माण झाला. त्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास यवतचा आठवडी बाजार बंद करण्यात आला. यावेळी एका गटाच्या लोकांनी काही दुचाकी पेटवून दिल्या. या घटनेमुळे गावात तणावपूर्ण स्थिती उद्भवली. यवतचे पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले की, आक्षेपार्ह तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याची चौकशी सुरू आहे. सध्याचा तणाव पाहता गावात मोठा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

पुण्यातील यवत गावात एका आक्षेपार्ह पोस्टवरून सुरू (पान ४ वर)

## उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबर रोजी निवडणूक

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू झाल्याच्या दिवशीच जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा अचानक राजीनामा दिला होता. जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर नवे उपराष्ट्रपती कोण होणार? कोणाला उपराष्ट्रपती पदाची संधी मिळणार? तसेच उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक कधी होणार? असे सवाल उपस्थित केले जात असताना निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपती पदाचा निवडणुक कार्यक्रम जाहीर केला आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार आता उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.निवडणूक आयोगाची ७ ऑगस्ट २०२५ रोजी अधिसूचना जारी होईल. नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २१ ऑगस्ट २०२५ असेल. नामांकन अर्ज छाननीची तारीख २२ ऑगस्ट २०२५ असेल. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५ असेल. मतदानाची तारीख ९ सप्टेंबर २०२५ असेल आणि त्यानंतर मतमोजणी होईल.

## बनावट नोटा तयार करणाऱ्या सात जणांना अटक

### मुख्य सुत्रधार फरार; चार आरोपी छत्रपती संभाजीनगरचे

अहिल्यानगर दि.१ (प्रतिनिधी)- बनावट नोटा तयार करणारा छत्रपती संभाजीनगर शहराजवळील कारखाना व या बनावट नोटा बाजारात वितरित करणारे रॅकेट अहिल्यानगर तालुका पोलिसांनी उघडकीस आणले आहे. एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र मुख्य सूत्रधार फरार झाला. पोलिसांनी ५९ लाख ५० हजार रुपये रुपयांच्या ५०० दराच्या बनावटांसह २ कोटी १६ लाख रुपयाच्या बनावट नोटा तयार तयार होतील, असा कागद, आधुनिक छपाई यंत्र असा एकुण ८८ लाख २० हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आज, शुक्रवारी या कारवाईची माहिती दिली. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, तपासी अधिकारी नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक प्रल्हाद गीते आदी यावेळी उपस्थित होते.

निखिल शिवाजी गांगर्डे (वय २७, कोंभळी, ता. कर्जत), सोमनाथ माणिक शिंदे (वय २५, तपोवन रस्ता, अहिल्यानगर), प्रदीप संजय कापरे (वय २८, तिंतरवणी, शिरूर कासार, बीड), मंगेश पंढरी शिरसाठ (वय ४०, शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर), विनोद दामोदर अरबट (वय ५३, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर), आकाश बनसोडे (वय २७, निसर्ग कॉलनी, पेठेनगर छत्रपती संभाजीनगर) व अनिल सुधाकर पवार (वय ३६, मुकुंदनगर, छत्रपती संभाजीनगर) या ७ जणांना अटक करण्यात आली आहे तर मुख्य सूत्रधार अंबादास रामभाऊ ससाने (रा. शहरटाकळी, शेवगाव, अहिल्यानगर) हा फरार आहे. सहायक पोलीस निरीक्षक गीते यांना सोलापूर रस्त्यावरील अंबिलवाडी (अहिल्यानगर) शिवारात बनावट नोटा बाजारात आणणारे दोघे येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार २७ जुलैला त्यांनी सापळा रचून निखिल गांगर्डे व सोमनाथ शिंदे या दोघांना अटक केली. त्यानंतर तपासात प्रदीप कापरे याला अटक करण्यात आली. त्याच्या माहितीनुसार नेवासा फाटा येथे एक जण ५० हजार रुपयांच्या खऱ्या नोटांच्या बदल्यात १ लाखांच्या बनावट नोटा देणार असल्याची माहिती मिळाली.

## अकोल्यात स्त्री रुग्णालयातील भ्रष्टाचार उघड; तीन वरिष्ठ आरोग्य अधिकारी निलंबित

अकोला दि.१ (प्रतिनिधी)- अकोल्याच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नवजात शिशु अतिदक्षता विभागातील ३१ पदांच्या भरतीसाठीची निविदा प्रक्रिया भ्रष्ट मार्गाने पार पडल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जयंत पाटील आणि प्रशासकीय अधिकारी ए. एन. डांबरे यांना निलंबित करण्यात आले आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली असून, तिघांवर विभागीय चौकशीचा बडगा उगारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे गेल्या सहा महिन्यांपासून अकोला जिल्हा स्त्री रूग्णालय हे चांगल्या कामाममूळे सातत्याने अव्वल असलेले रूग्णालय आहे.

सदर प्रक्रिया २०२४-२५ या आर्थिक वर्षात पार पडली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नवजात शिशु अतिदक्षता विभागातील ३१ पदं भरायची होती. ही पद बाह्य स्त्रोतांमार्फत त्रयस्थ संस्थांकडून कंत्राटी पद्धतीने भरायची होती. यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. याची निविदा १९ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.

## भाजपमध्ये जाण्यासाठी किती खोके घेतले?

### खोतकरांचा गोरंट्याल यांना सवाल

जालना दि.१ (प्रतिनिधी)- जालन्यातील काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या या प्रवेशावर शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी टीका केली आहे. तसेच या प्रवेशावरुन त्यांनी भाजपला सवालही केला आहे. आमच्या मित्र पक्षाने विचार करायला हवा होता. अशी लोक घेऊन भाजप काय साध्य करत आहे? असा सवाल खोतकरांनी केला. ज्यांच्याकडे जनाधार राहिला नाही, अशा लोकांना घेऊन भाजप काय साध्य करु इच्छित असल्याचे ते म्हणाले. कदाचित भाजप नेत्यांना कैलास गोरंट्याल यांनी केलेले घोटाळे माहिती नसतील असे खोतकर म्हणाले.

दरम्यान, याबाबत आमचे नेते एकनाथ शिंदे यांच्याकडे गोष्ट मांडलेली आहे ते भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांकडे चर्चा करतील. तुमची बायको पाच वर्षे नगरपालिकेची अध्यक्ष राहिलेली आहे त्यांना निवडून दिलेल आहे, मग तुम्हाला टीका सहन करावी लागेल. यामुळे त्यांचा भ्रष्टाचार लपणार नाही असे खोतकर म्हणाले. तुझी मस्ती आम्ही दहा-वेळा जिरवली आहे, तुझ्यात खूमखुमी असेल तर पुन्हा ये. तुला साध्या सोसायटीच्या निवडणुकीत आम्ही पाडल्याचे खोतकर म्हणाले.

ज्या लोकांनी तुला मतदान केलं त्यांना तू गद्दार झाल्याचे खोतकर म्हणाले. भाजपमध्ये जायचे याने किती खोके घेतले ? असा सवाल देखील खोतकरांनी गोरंट्याल यांना केलाय. या प्रवेशा (पान ४ वर)

## बलात्कार प्रकरणात प्रज्ज्वल रेवण्णा दोषी

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- कर्नाटकच्या हासन लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार आणि देशाचे माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा (वय ३४) यांना बलात्कार प्रकरणात दोषी ठरविण्यात आले आहे. कर्नाटकच्या विशेष न्यायालयाने आज हा निकाल दिला. घरकाम करणाऱ्या ४७ वर्षीय महिलेवर रेवण्णा कुटुंबाच्या फार्महाऊसमध्ये बलात्कार केल्याप्रकरणी प्रज्ज्वल रेवण्णांना दोषी ठरवले गेले आहे. २ ऑगस्ट रोजी न्यायालय शिक्षा सुनावणार आहे. न्यायालयाने आज आपला निकाल सुनावताच प्रज्ज्वल रेवण्णा यांना न्यायालयातच रडू कोसळले असे वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

लोकसभेची निवडणूक सुरू असताना २०२४ मध्ये प्रज्ज्वल रेवण्णा यांच्या व्हायरल व्हिडीओचे प्रकरण समोर आले होते. कर्नाटकमध्ये मतदान पार पडताच सदर प्रकरण बाहेर आल्यामुळे एकच गदारोळ उडाला होता. या प्रकरणात गुन्हा नोंद झाल्यानंतर आता १४ महिन्यांनी न्यायालयाने निकाल दिला आहे.

माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णावर बलात्काराची चार प्रकरणे दाखल झाली आहेत. त्यापैकी एका प्रकरणात त्याला दोषी ठरविण्यात आले आहे.

## करून भागले अन् देवपूजेला लागले

### वडेट्टीवार यांची गृहराज्यमंत्री योगेश कदमांवर टीका

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. योगेश कदम यांच्या आईच्या नावाने डान्सबार सुरू असल्याचे उघड झाल्यानंतर त्यांनी हळूच डान्सबारचा ऑर्केस्ट्रा परवाना परत केला. त्यांनी मंत्रिपदावर राहून पदाचा अवमान केल्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावाने मुंबईत डान्सबार असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी विधानपरिषदेत केला होता. योगेश कदम यांच्या आईच्या नावाने मुंबईत डान्सबार आहे. पोलिसांनी तिथे धाड टाकून तब्बल २२ बारबाला ताब्यात घेतल्या आहेत, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या आरोपानंतर कदम यांनी आता आपल्या बारचा परवाना सरकार दरबारी परत केला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, करून करून भागले, आता देवपूजेला लागले? राज्याचे गृहराज्यमंत्री आईच्या नावावर डान्स बार चालवतात, हे उघड झाल्यावर नाही म्हणतात आणि हळूच डान्स बारचा ऑर्केस्ट्रा (पान ४ वर)

## लवकरच एसटीचे रिटेल इंधन विक्रीत पदार्पण; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने केंद्र व राज्य सरकारच्या व्यावसायिक भागीदारीत एसटी महामंडळ राज्यभरात स्वतःच्या जागेवर विविध ठिकाणी व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्रीचे रिटेल विक्री (किरकोळ विक्री) पंप सुरू करीत असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजुक आहे. अशा परिस्थितीमध्ये केवळ प्रवासी तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या महसुल वर अवलंबून राहणे श्रेयस्कर नाही. त्यासाठी उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. गेली ७० वर्षापेक्षा अधिक काळ एसटी महामंडळ इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल कंपन्यांच्या कडून डिझेल इंधन विकत घेत आहे. (पान ४ वर)

## मंत्रिमंडळात कितीही पत्ते पिसले तरी डाग पुसले जाणार नाहीत-खासदार संजय राऊत

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- सरकार मंत्र्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार तसा प्रयत्न करत राहील. मात्र, सरकारने कितीही रंगसफेदी करण्याचा प्रयत्न केला तरी सरकार कलंकित झाले आहे. महाराष्ट्राला डाग लागला आहे. तो अशा प्रकारच्या मंत्रिमंडळातील पत्ते पिसल्यामुळे तो डाग पुसला जाणार नाही. त्यामुळे मंत्र्यांना जावेच लागेल, असे मी खात्रीने सांगत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

राज्यातील सहा ते सात मंत्र्यांना राजीनामे द्यावे लागतील, असा दावा राऊत यांनी केला होता. मात्र, मंत्री मंडळामध्ये केवळ दोन मंत्र्यांचे खाते बदल करण्यात आले आहेत. यावरुन राऊत यांनी देवेंद्र फडणवीस सरकारवर टीका केली आहे. राज्यातील कलंकित मंत्र्यांना जावेच लागणार असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

या विषयी राऊत म्हणाले की, वसईच्या आयुक्तांवर पडलेली धाड हे १००० कोटींचे प्रकरण आहे. त्यात देखील एका मंत्र्याला जावे लागेल. तसेच आता जे नवीन क्रीडा मंत्री आहेत. वास्तविक त्यांना आता योग्य खाते मिळाले आहे. ही देखील तात्पुरती व्यवस्था आहे. प्रत्येक आरोपी शेवटपर्यंत स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न करत असतो. देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा यांच्या भेटीमध्ये काय सांगितले? हे मला माहिती असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

कोकाटे यांच्यावर झालेली कारवाई ही थातूरमातूर आहे. वास्तविक आरोपी मंत्री आणि त्यांचे नेते आपापल्या माणसांना वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. याचा जनतेच्या आणि विरोधी पक्षाच्या मतावरती काहीही परिणाम होणार नाही. देवेंद्र फडणवीस यांना देखील हेच करायचे आहे. दिल्लीत अमित शहा यांच्या भेटीमध्ये मुख्यमंत्र्यांनी त्यांना देखील तसे सांगितले आहे. अशा लोकांबरोबर मला काम करणे अवघड झाले असल्याचे फडणवीस यांनी शहांना सांगितले आहे. त्यामुळे याबाबत निर्णय घ्यावा लागेल, असे त्यांनी शहा यांना सांगितले आहे. सरकार आणि राज्याची यामुळे बदनामी होत असल्याचे फडणवीस शहांना म्हणाले असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

## कंगना रणौतला पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचा झटका! मानहानी प्रकरणातील याचिका फेटाळली

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- अभिनेत्री आणि भाजपाच्या खासदार कंगना रणौतने दाखल केलेली याचिका शुक्रवारी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. शेतकरी आंदोलनाबाबत केलेल्या एका टीप्पणीनंतर तिच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. यावर कंगना रणौतने न्यायालयात धाव घेत ही तक्रार रद्द करण्याची विनंती केली होती. उच्च न्यायालयाने ही विनंती रद्द केल्याने आता प्रकरणातील खटला पुन्हा सुरू होईल. यामुळे कंगनाच्या अडचणी वाढू शकतात.

टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार, उच्च न्यायालयाने एका विस्तृत आदेशात निरीक्षण नोंदवले की, '' याचिकाकर्ता, ज्या एक सेलिब्रेटी आहेत, यांच्या विरोधात काही विशिष्ट आरोप करण्यात आले आहेत की, त्यांनी रिट्विटमध्ये केलेल्या खोट्या आणि बदनामीकारक आरोपांमुळे प्रतिवादीच्या प्रतिष्ठेला (पान ४ वर)

# मराठवाड्यात भूमाफियांचा उच्छाद

मराठवाड्यात संपत्तीच्या खरेदी-विक्रीच्या प्रकरणात अनेक उलाढाली होतात. राज्याचे मंत्री यांच्याविषयी हॉटेल प्रकरणातील निविदेवरून बराच गोंधळ माजला. लातूर व धाराशिव जिल्ह्यातही अशाच भूखंड प्रकरणावर तेथील राजकारणी काही दिवसांपूर्वी चांगलेच चर्चेत आले होते. मराठवाड्यात संपत्तीविषयक अडीअडचणी दिवसेंदिवस वेगवेगळे रूप घेत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र व तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या मराठवाड्यातील नांदेड शहरात अलीकडेच घडलेला एक प्रकार चर्चेत आहे. तेलंगणातील हैदराबाद येथील एल. बी. नगर या भागात राहणाऱ्या एका मध्यम वर्गीय दयानंद ठाकूर नामक कुटुंबीयांना नांदेड शहरात हृदयद्रावक अनुभव आला. कोट्यवधी रुपयांचा भर रस्त्यावर असलेला नांदेडमधील मोक्याचा प्लॉट नावावर करून देण्याच्या कारणावरून बेदम मारहाण करण्यात आली. भर दिवसा रस्त्यावर कपडे फाटेपर्यंत मारहाण करून त्यांना रजिस्ट्री ऑफिसमध्ये घेऊन जाण्यात आले. नांदेड शहरातील आयटीआय परिसरात मुख्य रस्त्यावर अंदाजे ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक बाजार किंमत असलेल्या मोकळ्या भूखंडावरून ही मारहाण करण्यात आली. त्यांना जबरदस्तीने रजिस्ट्री ऑफिसम ध्ये नेऊन मोठ्या भूखंडाची रजिस्ट्री करण्यासाठी भाग पाडत असल्याच्या प्रकाराने खळबळ उडाली. त्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले होते. त्यांच्या अंगावरील कपडे मारहाणीमुळे फाटले होते. त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मुका मार देखील लागला.

अशा परिस्थितीत भूखंडाची रजिस्ट्री प्रक्रिया सुरू होती. त्यावेळी त्या कार्यालयातील अधिकारीही त्यांना त्यांच्या अवस्थेबद्दल काहीही विचारत नव्हते; परंतु एक माजी आमदार त्या ठिकाणी पोहोचले व त्यांनी पुढील प्रक्रिया थांबविली. तत्पूर्वी हैदराबाद येथील त्या कुटुंबीयांनी शिवाजीनगर पोलीस स्थानकात या संदर्भात तक्रार नोंदविली; परंतु त्यांना देखील पोलिसांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. नांदेडनंतर असाच काहीसा प्रकार बीड व धाराशिव जिल्ह्यात देखील घडला. प्लॉटवर बेकायदेशीररीत्या ताबा करणे, त्यानंतर त्यामध्ये वाद उत्पन्न करणे व प्रकरण न्यायप्रविष्ट करणे, अशा म ाध्यमातून हे भूमाफिया सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांना त्रासून सोडत आहेत. न्यायालयीन प्रक्रियेत एखादा विषय गेला की मग पोलीसवाले देखील या प्रकरणात हात टाकत नाही. त्यामुळे पोलिसांचा आधार मिळत नसल्याने सेटलमेंट करण्याशिवाय पर्याय नाही, अशी परिस्थिती निर्माण करून गोरगरिबांचे व मध्यमवर्गीयांचे भूखंड हडपण्याची एक टोळीच सध्या मराठवाड्यात कार्यरत झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच मराठवाड्यातील या भूमाफियांविरुद्ध कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. मोकळा प्लॉट, घर, फ्लॅट व दुकान यांच्या किमती सर्वत्रच दिवसेंदिवस वाढत आहेत. संपत्तीची खरेदी-विक्री व मोकळ्या जागेत पैसे गुंतवून त्यामधून मोठी रक्कम कमविणे हा काहींचा धंदाच होऊन बसला आहे. या उलाढालीमधून पैशांची आवक-जावक प्रमाणात होते. हे लक्षात आलेल्या काही लोकांनी झटपट श्रीमंत होण्याच्या नादात स्वतःचे पाय बेकायदेशीर कामाकडे वळिवले आहे. असेच काही लोक भूमाफिया म्हणून मराठवाड्यात उच्छाद मांडत आहे.

विशेष म्हणजे भूमाफिया दोन पैशांच्या जीवावर तरुणाईला या प्रकरणात ओढून घेतात. त्यांच्या हातून मारहाण करणे, धमकावून हे असे कृत्य करून त्यांचेही जीवनमान बिघडवीत आहे. अशा भूमाफियांना सरकारी संरक्षण बेकायदेशीररीत्या मिळत आहे. तसेच या लोकांना मदत करण्यासाठी सरकारी यंत्रणा पैशांच्या पुढे झुकत असल्याचे अलीकडे घडलेल्या घटनांवरून दिसून येते. या प्रकारांकडे वरिष्ठ अधिकारीही कानाडोळा करत असल्याने भूमाफिया खालपासून वरपर्यंत पोहोचलेले आहेत की काय, अशी शंका घेण्यास वाव शिल्लक राहतो. अशा भूमाफियांवर वेळीच आवर घालणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात मराठवाड्यात या प्रकरणात खून, हाणामारी, न्यायालयीन प्रकरणे नक्कीच वाढणार आहेत व शेवटी या सर्वांचा त्रास सरकारी यंत्रणेलाच होणार आहे.

छोटेसेच का असेना; परंतु स्वतःचे एक घर असावे, अशी सर्वांचीच मनोमन इच्छा असते. याच भावनेतून म ध्यमवर्गीय जीवापाड मेहनत करतो. सकाळी उठल्यापासून रात्री उशिरापर्यंत राबणे व स्वतःच्या कुटुंबाचा गाडा हाकण्यासाठी मेहनत घेणे हेच सर्वसामान्यांचे जीवन असते; परंतु अशा सर्वसामान्यांच्या स्वप्नांचा चुराडा करणारी टोळी मराठवाड्यात कार्यरत झाली आहे. मोकळ्या प्लॉटची जुनी कागदपत्रे रजिस्ट्री ऑफिसम धून मिळिवणे व त्या आधारावर खोट्या बाँड पत्राच्या आधारे करार करून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट करणारी काही उदाहरणे समोर आली आहे. न्यायालयाचा वेळ वाया घालवत असे भूमाफिया सरकारी यंत्रणेबरोबरच न्यायालयाचीही दिशाभूल करतात. हे प्रकरण वेठीस धरून त्यानंतर मोठ्या रकमेची मागणी करणे तसेच याम धून धमक्या देणे किंवा मोकळ्या प्लॉटवर झेंडे लावून, फोटो लावून विजातीय तरुण हैदोस घालत आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याने याकडे शासनाने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत भूमाफियांनी उच्छाद मांडला आहे. जागांच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे असे भूमाफिया जिकडेतिकडे मोठ्या प्रमाणात वाढलेत. या भूमाफियांकडे गुंडांचे टोळके वावरते. तसेच काही सरकारी अधिकारी हातात असल्याने भूमाफियांची हिंमत वाढते. यामधूनच म राठवाड्यात कायदा- सुव्यवस्था बिघडत असल्याचे अलीकडे घडलेल्या प्रकरणांवरून दिसून येते.

# ‘ऑपरेशन सिंदूर आणि इतिहासाचे ओझे’

२२ एप्रिल २०२५ला भारतीय इतिहासातील पाक पुरस्कृत दहशतवादाचे अजून एक रक्तरंजित पान लिहिले गेले. १२ मार्च १९९३, २६नोव्हेंबर २००८ या ऐतिहासिक तारखामध्ये २२ एप्रिल २०२५ या तारखेची भर पडली आणि या दिवसाची आठवण चिरकाल टिकेल. पहलगाम जवळील बैसरणा वॅली येथे २५ भारतीय व १ नेपाळी पर्यटकांची धर्म विचारून गोळी घालून हत्या करण्यात आली. या हत्याकांडात २५ हिंदू व एका मुस्लिम घोडेवाल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या भीषण हल्ल्यातूनच 'ऑपरेशन सिंदूर ' चा जन्म झाला.

योगायोग असा की संसदेत ‘ऑपरेशन सिंदूर’ वर चर्चा चालू असतानाच पहलगाम हत्याकांड घडवून आणणाऱ्या तीन पाकिस्तानी दहशतवाद्याना ‘ऑपरेशन महादेव’ दरम्यान भारतीय सुरक्षा यंत्रणानी कंठस्नान घातले आणि ‘बदल्याचे’ एक चक्र पूर्ण झाले. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्डयावर हल्ले करून भारतात दहशतवाद घडवून आणणाऱ्या सूत्रधारांत असुरक्षिततेची भावना निर्माण करण्यात भारत यशस्वी ठरला पण प्रत्यक्ष हल्ला करणारे दहशतवादी मात्र मोकाट असल्याने एक प्रकारची ‘अपूर्णतेची’ भावना भारतीय जन मानसात होती. हल्लेखोरांना यमसदनास पाठवल्यानं हल्ल्यात जीव गमावलेल्या ‘हुतात्म्यांच्या’ परिवाराना थोडाफार दिलासा जरूर मिळाला असेल. पण हे ‘दुष्टचक्र’ इथेच थांबेल का? हा भविष्याच्या दृष्टीने एक अनुत्तरित प्रश्न कायम राहणारच आहे.

या अनिश्चित भविष्याची मुळे काश्मीर, भारत, पाकिस्तान यांच्या इतिहासात दडली आहेत. या इतिहासाचा विचार करताना ज्या ऐतिहासिक 'चुकांचा ' उल्लेख प्रामुख्याने वारंवार होतो तसेच ज्या घटनांचा उल्लेख केला जात नाही त्याही घटनांचे 'तटस्थपणे' विश्लेषण करणे आवश्यक वाटते.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्या मिळाल्या पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला केला. भारतीय सैन्याने शत्रूला मागे रेटत रेटत पूर्ण काश्मीर टोळीवाल्यांच्या कब्जातून मुक्त करण्याच्या दृष्टीने पावलं टाकली. पण जवाहरलाल नेहरूनी आपल्या मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता एकतर्फी युद्धविराम जारी करून काश्मीरचा प्रश्न 'युनो' मध्ये नेला आणि हेच ‘काश्मीर समस्या’ म्हणून भारताला जडलेल्या ‘कर्करोगाचे’ मूळ कारण ठरले. यासाठी जवाहरलाल नेहरू हेच निःसंशयपणे जबाबदार होते. यात त्यांना कुठलाही संशयाचा फायदा दिला जाऊ शकत नाही.

कर्करोग झाल्याचे लक्षात आल्यावर त्यावर ‘थातुरमातुर’ मलमपट्टी करण्यासाठी जम्मू काश्मीर साठी ‘आर्टिकल ३७०’ ची उपाययोजना करण्यात आली आणि त्यात ‘३५ए’ या घातक कलमाची औषधंयोजना करण्यात आली. हे कलम संसदेची मान्यता न घेताच घुसडण्यात आले. यासाठी सुद्धा जवाहरलाल नेहरूच पूर्णतः जबाबदार होते.

कर्करोग एकदा बळावल्यावर या रोगाचे समूळ उच्चाटन करणे शक्य नाही हे लक्षात यायला फार वेळ गेला. यातूनच पाकिस्तानबरोबरच्या कायम स्वरूपी संघर्षाला सुरुवात झाली.

१९६२ मध्ये चीनने भारताविरुद्ध युद्ध पुकारून भारताचा दारुण पराभव केला. अमेरिकेने भारताला शस्त्रपुरवठा चालू केल्या केल्या चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली. अमेरिकेचे हे उपकार भारत विसरू शकत नव्हता.

अमेरिकेच्या या उपकारांच्या ओझ्याखाली भारत (म्हणजेच नेहरू ) अमेरिकेच्या दडपणामुळे काश्मीरचा काही भूभाग पाकिस्तानला बहाल करण्यास राजी झाले होते.(१९६३) आपण झुल्फिकार अली भूत्तोचे आभार मानले पाहिजेत की त्याने पूर्ण काश्मीर मिळवण्याचा हट्ट धरल्यामुळे ही योजना बारगळली.

इथे नेहरूंची चूक होती का? त्यावेळच्या ‘आगतिक’ परिस्थितीत नेहरुंच्या जागी इतर कोणीही पंतप्रधान असता तरी त्याला नेहरुंसारखाच विचार करावा लागला असता त्यामुळे नेहरूना पूर्णपणे दोषी ठरवता येत नाही(जरी ही परिस्थिती त्यांच्यामुळेच निर्माण झाली होती तरी)

१९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर पुन्हा हल्ला करून काश्मीर बळकवण्याचा प्रयत्न केला. लाल बहादूर शास्त्री यांनी नेहरुंच्या चुकांपासून बोध घेऊन थोडी आक्रमकता दाखवली. त्यांनी पश्चिम पाकिस्तानात सैन्य घुसवून पाकिस्तानवर दडपण आणले. या लढाईत भारताने अत्यंत स्ट्रॅटेजिक ‘हाजीपीर ’ खिंड जिंकली होती पण रशियाच्या दबावाखाली भारताला ती पाकिस्तानला परत करावी लागली.

शास्त्रीजी यासाठी बिलकुल तयार नव्हते पण रशियाचा दबाव व आपल्या सहकार्यांचा सल्ला मानून त्यांनी 'जड' अंतःकरणाने 'ताशकंद करारावर सही केली. 'हाजीपीर खिंड जर आपल्या ताब्यात असती तर कदाचित त्यानंतरच्या पाकिस्तानी घुसखोरीला आळा घालता आला असता.

या घोडचचुकीबद्दल इतकी वर्षे झाल्यावर 'शास्त्रीना ' संपूर्णपणे जबाबदार ठरवणे अन्यायकारक ठरेल.एक तर शास्त्रीजी कुठल्याही स्वप्नाळू दुनियेत वावरत नव्हते आणि भारत अंतरराष्ट्रीय राजकारणात रशियावर पूर्णपणे अवलंबून होता. तसेच चीनकडून झालेल्या पराभवाच्या जखमा पूर्णपणे भरून यायच्या होत्या.या परिस्थितीत इतर कुठलाही पंतप्रधान वेगळा वागला असता का?

१९७१ च्या युद्धात पाकिस्तानचा निर्विवाद पराभव होऊन पूर्व पाकिस्तान, पाकिस्तानपासून वेगळा होऊन,स्वतंत्र बांगला देशची निर्मिती झाली.

पण इंदिरा गांधींनी सिमला करार करताना ९३००० हजार युद्धाकैद्यांच्या बदल्यात पाक व्याप्त काश्मीर का परत घेतला नाही असा प्रश्न विचारला जातो तो चुकीचा वाटतो. १९७१च्या लढाईचा उद्देश बांगलादेश निर्माण करणे हा होता, पी. ओ. के. ताब्यात घेणे हा नव्हता.तसेच द्विपक्षीय वाटाघाटीत युद्धकैद्यांचा सौद्यासाठी वापर करू नये हे जिनिवा कराराचे कलम आहे. इंदिरा गांधीची अक्षम्य चूक ही झाली की त्यांनी ९३००० युद्धबंद्याच्या बदल्यात भारताचे पाकिस्तानच्या ताब्यातील ५४ युद्धकैदी सोडवून आणले नाहीत.

१९८३ची विस्मृतीत गेलेली एक घटना जिने काश्मीरच्या राजकारणाला वेगळे वळण लावले तिचा आजकाल उल्लेख होत नाही. जे. के. एल. एफ. चा अतिरेकी मकबूल बट याला फाशीची शिक्षा झाली होती. त्याला सोडवण्यासाठी अतिरेक्यानी भारताचे ब्रिटन एम्बसी मधील अधिकारी रवींद्र म्हात्रे यांचे अपहरण करून हत्या केली पण इंदिराजी बधल्या नाहीत.

मकबूल बटला फासावर चढवले गेले.इंदिरा गांधींचा कणखरपणा कौतुकास्पद होता. १९९०मध्ये विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान होते. त्यावेळी केंद्रीय गृहमंत्री मुफ्ती मोहम्मद सैद यांची कन्या रुबीया हिचे'तथाकथित' अपहरण झाले होते.त्यावेळी तिच्या सुटकेसाठी सहा खुखार आतंकवाद्यांची सुटका केली गेली. ही केंद्र सरकारची 'महाचूक' होती. इथूनच पुढे काश्मीरमध्ये अतिरेक्याना मोकळे रान मिळाले व ते भारताच्या डोक्यावर बसले. हे अपहरण घडवून आणले होते का असा प्रश्न त्यावेळी चर्चीला गेला होता. कै. राजीव गांधींनी त्यावेळी आरोप केला होता की गृहमंत्र्यांच्या मुलीला घरून 'टिफिन' पुरवला जात होता.

काश्मीरबाबत नेहमी फक्त नेहरू, इंदिरा गांधींना जबाबदार धरले जाते पण व्ही. पी. सिंग यांचे नाव घेतले जात नाही. खरं म्हणजे व्ही. पी.सिंग यांच्याच काळात काश्मीरची स्थिती हाताबाहेर गेली. काश्मिरी पंडितांचा वंश संहार व पलायन सिंग यांच्याच काळात घडले.या घटनेचा उल्लेख आजकाल केला जात नाही.

वाजपायी पंतप्रधान असताना भारताचे खउ८१४ विमान हैजॅक केले गेले तेव्हा प्रवाश्यांच्या सुटकेच्या बदल्यात अझर मसूद सकट चार धोकादायक पाकिस्तानी अतिरेक्याची मुक्तता करण्यात आली. हा निर्णय भारताच्या सुरक्षेच्या मुळावर आला. हा निर्णय टाळता आला असता का? हा निर्णय घेतल्याबद्दल वाजपायी सुद्धा जबाबदार ठरतात.

मनमोहन सिंग यांच्या काळात सियाचिनचा प्रदेश डी मिलिटरीझ करण्याची कल्पना मांडण्यात आली. त्या वेळचे परराष्ट्र सचिव श्याम सरण यांची ही कल्पना होती. मनमोहनसिंग यांना ही कल्पना पसंत होती पण तेव्हाचे लष्कर प्रमुख जे. जे. सिंग यांनी या प्रस्तावाला कडाडून विरोध केला म्हणून ही कल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. विशेष म्हणजे कारगिल मध्ये पाकिस्तानने केलेला विश्वासघात माहित असून सुद्धा मनमोहन सिंग या प्रस्तावाला राजी झाले होते.काही वर्षांपूर्वी टी. व्ही. वरील चर्चेत खुद्द जे. जे. सिंग यांनी हा खुलासा केला. त्यावेळी शाम सरण यांनाही चर्चेत बोलावले होते पण ते सहभागी झाले नाहीत.

शेवटच्या पाच घटनांचा उल्लेख कोणी केल्याचे फारसे वाचनात आले नाही. वरील सर्व इतिहासाचे ओझे खांद्यावर असह्य झाल्यानेच ते केव्हातरी फेकून दिलेच पाहिजे याच जाणीवेतून ‘ऑपरेशन सिंदूर’ची गरज निर्माण झाली आणि ते यशस्वीपणे अमलात आणले गेले. तरी यानंतर दहशतवादाला आळा बसेल का या प्रश्नाचे उत्तर काळच देईल.

– रघुनंदन भागवत

# मराठा आरक्षण सुनावणी शनिवार २ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयात होणार!

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - मराठा एसईबीसी आरक्षणाची महत्व पुर्ण सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात शनिवार दिनांक ०२ऑगस्ट २०२५ रोजी कोर्ट हॉल क्रमांक १३ येथे सकाळी १०.३० वाजता मा. न्यायमुर्ती रविंद्र घुगे, न्या. एन.जे. जमादार, न्यायमुर्ती संदीप मारणे यांचे स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयात सकाळी १०.३० वाजेपासून सुरू होणार असून मागील सुनावणीत घटनादुरुस्ती शिवाय आरक्षण कसे देणार ? हा जेष्ठ विधीज्ञ गोपाल शंकरनारायण यांचा कायदेशीर व घटनात्मक पाठबळ असणार प्रश्न अनुत्तरित राहिला असून वर्षानुवर्षे पुरोगामी राहिलेला मराठा समाज अचानक मागास कसा झाला? मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण कसे देणार ? असे एक ना अनेक प्रश्न या सुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात येऊन ५०टक्के पुढील स्वतंत्र १० टक्के आरक्षण घटना दुरुस्ती शिवाय कसे ? असा महत्वाचा प्रश्न आता निर्माण झाला असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष खंडपीठापुढे मराठा आरक्षणाच्या अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. आरक्षण कायद्यास आव्हान देणारे वरिष्ठ वकील अरविंद दातार व वरिष्ठ वकील गोपाळ शंकरनारायण, प्रदीप संचेती यांनी याचिका कर्त्यांच्या वतीने युक्ति वाद केला.

सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा घालून दिलेली असतानाही मराठा समाजाला सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या मागास ठरवून महाराष्ट्र शासन ५०%आरक्षण मर्यादांचे सातत्याने उल्लंघन करत असून महाराष्ट्र शासनाचा आरक्षण देण्याचा निर्णय घटनात्मक तरतुदींचा उल्लंघन ठरत आहे असा युक्तिवाद अरविंद दातार जेष्ठ विधीज्ञ शंकरनारायण यांनी केला होता.

निवृत्त न्यायमूर्ती एम.जी. गायकवाड मागासवर्ग आयोगाने सर्वप्रथम,मराठा समाज सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असून हा समाज मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकला गेल्याचा अहवाल सादर करून या समाजाला सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थां मध्ये आरक्षणाची शिफारस केली ही अचानक बदलेली परिस्थिती न उलडगणारी आहे,असे ही अँडव्होकेट शंकरनारायण यांनी मराठा आरक्षणाला विरोध करताना न्यायालयात मागील सुनावणीत सांगितले होते.

**सुनावणीतील थोडा इतिहास**

मराठा आरक्षणा संदर्भातील अंतिम सुनावणीला मुंबई उच्च न्यायालयात सुरुवात झाली असुन १८ व१९जुलै च्या सुनावणीत मराठा समाज मागास नाही? हे सिद्ध करण्याकरता पुरावे सादर करण्याचे विरोधी याचिका कर्त्यांना निर्देश दिले होते.

या विशेष न्यायालयात न्यायालयात याचिकाकर्ते भाऊसाहेब भुजंगराव पवार, अँड.जयश्री लक्ष्मण पाटील, सीमा श्रीगोपाल मांधा,संजित राममिलन शुक्ला,प्रथमेश उदय ढोपले आणि इतर व्यक्तींनी महाराष्ट्र शासन व राज्य सचिव सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांचे विरोधात जनहित याचिका, याचिका दाखल केलेली



असुन हस्तक्षेप याचिकाकर्ता म्हणुन मराठा समाजा च्या वतीने आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील हे मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता असुन त्यांचे वतीने अँड श्रेयश संजीव देशपांडे व अँड मधुर अनिल गोलेगावकर हे कामकाज पहात आहेत. दरम्यान, गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या वेळी याचिका प्रलंबित असे पर्यंत शैक्षणिक प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यांतील नियुक्त्यां बाबत उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा दिल्याची बाब निर्दशनास आणून दिली गेली नाही. परंतु,आधीच्या सुनावणी च्या वेळी दिलेला दिलासा हा २०२४- २५ या शैक्षणिक प्रवेशा पुरता कायम होता.यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे काय ? असा प्रश्न आरक्षणाला विरोध करणाऱ्यांनी उपस्थित करून सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती हे पूर्ण पीठाला सांगण्यात आले होते. तथापि, आधीच्या सुनावणीच्या वेळी अंतरिम दिलासा देण्या बाबत सविस्तर सुनावणी झाली होती.

कोणीतरी नव्याने याचिका करते आणि अंतरिम दिलासा देण्याची मागणी करते हे सत्र सुरूच राहणार आणि मूळ प्रकरण अंतिमत: ऐकले जाणार नाही,असे राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी पूर्णपीठाला मागील सुनावणीत सांगितले होते.सर्वोच्च न्यायालयाला जर वाटलं तर ते नव्यानं निर्देश जारी करतील, असं स्पष्ट करण्यात आलं. त्यानंतर जेष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी आपल्या युक्तिवादास सुरूवात केली होती. त्यांचा प्राथमिक युक्तिवाद ऐकल्या नंतर यासंदर्भातील दोन अहवालात काय फरक आहे?, मराठा समाज मागास कसा नाही? हे आम्हाला पटवून द्या, अशी भूमिका उच्च न्यायालयानं घेतली होती. दरम्यान, या प्रकरणी पुढील सुनावणी २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

मान्यवर वकीलांचा सहभाग

अँड अरविंद दातार, ज्येष्ठ वकील. प्रतिवादी अधिवक्ता गोपाल शंकरनारायणन, वरिष्ठ अधिवक्ता प्रदीप संचेती,वरिष्ठ अँड. पल्लवी बाली, आशिष मिश्रा, प्रथमेश कामथ, यश ओझा, कु.निझिका पिंटो, श्री. विष्णुदत्त मिश्रा, याचिका कर्ते गोपाल शंकरनारायणन, सह अश्विन देशपांडे याचिकाकर्त्या साठी तर निहार चित्रे आणि कु. त्रिशा चंद्रास ऍंड सुभाष झा, हरे कृष्ण मिश्रा आणि सिद्धार्थ झा आणि अपेक्षा शर्मा लॉ ग्लोबल अँडव्होकेट्स याचिकाकर्ते अँड प्रदीप संचेती, जेष्ठ अँड. याचिकाकर्ते अश्विन देशपांडे सह निहार चित्रे,अनिल अंतुरकर जेष्ठ वकील अथर्व हर्षवर्धन सुर्यवंशी आणि अँड. कशिश चेलानी व कु.कविता प्रकाशअँड गौरव चौबे याचिका कर्त्यासाठी अँड.लुबना अन्सारी, राकेश जे.पांडे याचिका कर्त्यासाठी असुन महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सर्व बाबींमध्ये अँड साकेत मोने आणि अंचिता नायर आणि देवांश शहा हे विधी पक्षाचे सदस्य आहेत. डॉ. बिरेंद्र बी. सराफ, एजी,पी. पी. काकडे,जीपी,ओ.ए. चांदूरकर,अतिरिक्त जी.पी,जय संकलेचा,बी पॅनेल,श्रीमती जी. आर.रघुवंशी, एजीपी, राज्य/प्रतिनिधी,सर्व बाबीं मध्ये शासनाच्या वतीने वरिष्ठ वकील व्ही. ए.थोरात, वरिष्ठ वकील सुश्री प्राची तटके,विशेष वकील पी.पी. काकडे, जी.पी ओ.ए.चांदुरकर, अतिरिक्त जी.पी श्रीमती जी. आर. रघुवंशी, एजीपी राज्य/प्रतिनिधि दिन्यार मॅडन, वरिष्ठ वकील चिराग जे.शाह, मनिनी रॉय, श्यामसुंदर बी. जाधव, ए.वाय.साखरे,वरिष्ठ वकील उत्सव त्रिवेदी, अर्पित गुप्ता,आशिष कुमार यादव, विशाल आचार्य, अँड रवी कदम, वरिष्ठ वकील चिराग शाह, मनिनी रॉय, श्यामसुंदर बी.जाधव, अनिल सी.सिंह, वरिष्ठ वकील सचिन पवार, आदर्श व्यास, रुचिता वर्मा, एकता अँड. देवदत्त कामत, वरिष्ठ वकील हर्ष पांडे, हिमांशू सचदेवा पियुष तिवारी,उत्सव त्रिवेदी क आशिष कुमार यादव, अश्विनी बी. जाधव अँड एकता दळवी, कविता धानुका,अँड.जनक द्वारकादास, वरिष्ठ अधिवक्ता नम्रता विनोद पीयूष तिवारी आणि झल अंध्यार्जुन,वरिष्ठ अधिवक्ता हिमांशू सचदेवा, पीयूष तिवारी उत्सव त्रिवेदी, कु. मनिनी रॉय अर्पित गुप्ता आणि विशाल तसेच मराठा मुस्लिम आरक्षण कृती समिती महाराष्ट्रा साठी अँड मधुर गोलेगावकर व अँड श्रेयस देशपांडे हे कामकाज पहात असून, अँड श्रीराम पी.पिंगळे, अँड सूर्यजीत चव्हाण,बजरंग एम सोळंके, विशाखा शेलार, अँड. रूपेश के. बोबडे, अँड श्रद्धा नाकाडी या सह अनेक विधीज्ञ कामकाज पहात आहेत.

# हजारो भाविकाचा उपस्थित भगवान पार्श्वनाथ मोक्ष कल्याणक व वार्षिक रथयात्रा महोत्सव उत्साहात संपन्न

छत्रपती सभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - जैन धर्माचे २३ वे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांचा मोक्ष कल्याण दिवस वेरूळ येथील पहाड मंदिर वर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर महाराज यांचे परमिशन निर्यापक नियम सागर महाराज वृषभ सागर महाराज सुपार्श्व सागर महाराज व अभिनंदन सागर महाराज यांच्या मंगल सानिध्यामध्ये गुरुकुल परिसरातून भगवान पार्श्वनाथची रथयात्रा वेरूळ गावातून काढण्यात आली या यात्रेचे समापन पहाड मंदिर च्या पायथ्या जवळ करण्यात आले. प्रातःसमयी गुरुकुल परिसरामध्ये असणाऱ्या पार्श्वनाथ भगवंताच्या मंदिरामध्ये अभिषेक बोल्या व पूजन करण्यात आले तर पहाड मंदिर वरभगवंताच्या विराजमान पासून तर निर्वाण कल्याणक अभिषेक पूजन इ अनेक बोल्या बोलण्यात आल्या. पार्श्वनाथ भगवंतांना निर्वाण लाडू चढविण्याचा मान चातुर्मास कमिटीचे संयोजक नवीन पाटणी,विजय जितेंद्र पाटणी, उज्वला पाटील, अनुपमा पाटणी यांना प्राप्त झाला.

भगवंताच्या अभिषेकाच्या बोल्यामध्ये जलाभिषेक डॉ सुकुमार नवले, जितेंद्र मयूर पाटणी, तर चतुर्थकलश छाया विजय हनुमंते, महेंद्र भागोजी दगडफोडे, नीरज विश्वेश्वर जैन ,अश्विनी अमोल ठोले, बाहुबली धोंगडे यांना प्राप्त झाला. पूर्ण कलश रूपाने अभिषेक करण्याचा सन्मान भारत यशवंत वायकोस तर पार्श्वनाथ भगवंताची शांतीधारा करण्याचा सन्मान सौ नीना राणी, संजय कुमार, रुचिका, वसुंधरा गाजियाबाद यांना प्राप्त झाला. भगवंताची मंगला आरती सौ. रेखा दिनेश गंगवाल यांनी केली तर मंदिरवर ध्वजारोहण नवीन पाटणी यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील स्वर्गीय देवेंद्र सोनी यांच्या स्मरणार्थ श्रीमती शांती देवी सोनी, रोहित शिल्पा, संस्कार, संस्कृती व सोनी परिवार यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तर जलपान स्वर्गीय धर्मचंद यांचे स्म रणार्थ सुभाषचंद, धीरजकुमार, मयूर, चिराग, चेतन पाटणी परिवार आडगाव वाला यांच्यातर्फे करण्यात आले होते यावेळी प पू १०८नियम सागर महाराज, वृषभसागर महाराज अभिनंदन सागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांचे मांगलिक प्रवचन संपन्न झाले. ‘संसार हे दुःखाचे कारण आहे तर भगवान पार्श्वनाथ यांनी अवलंबलेला त्यागाचा मार्ग हा खऱ्या सुखाचे द्योतक असल्याचे आपल्या मांगलिक प्रवचनातून उपस्थित श्रावकांना उद्बोधन केले‘.यावेळी विविध २३ निर्वाण लाडू चढविण्याचा बोली मध्ये प्रेमचंद पाटणी, दिनेश गंगवाल, पूजा बाकलीवाल,रश्मी राणू मोदी अक्षय सोनटक्के जयचंद पाटणी, शाश्वत संघवी,अक्षय बोंद्रे, श्रेणिक गोसावी, लासुर महिला मंडळ, विजयाबाई काला, मयूर बाकलीवाल, निपुण कान्हेड, आदित्य संगवे, नंदा नरखडे, दगडू संगवी, सृजन व्यवहारे दिव्या कुरकुटे, राहुल धोंडालकर, समीर अजमेरा, वसंताबाई कासलीवाल स्वप्नील ठोले व नवकार युवती मंडळ यांना प्राप्त झाला. या कार्यक्रमासाठी कन्नड चापानेर बोरगाव लासुर छत्रपती संभाजी नगर इत्यादी ठिकाणी होऊन अनेक भाविकांनी गर्दी केली होती कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शन चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष दिनेश गंगवाल, डॉ प्रेमचंद पाटणी,नवीन पाटणी, मदनलाल पांडे सुमित ठोले, गौतम ठोले, निर्मलकुमार ठोले महेंद्र दगडफोडे यांचे लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंडित मनीष भैया यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेरूळ येथील श्रावक व श्राविकनी अथक परिश्रम केले. अशी महिती अतुल बादे सुहास मिश्रीकोटकर नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात जयंतीनिमित्त अभिवादन





छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी)- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, उपजिल्हाधिकारी सामान्य संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी संगिता सानप तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यांची यावेळी उपस्थिती होती.

# इमाव विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह प्रवेश वेळापत्रक

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी https://hmas.mahait.org शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज मागविण्याबाबत वेळापत्रक निश्चित झाले आहेत.

बी.ए., बी.कॉम, बी.एस.सी, अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम ए एम एस सी असे पदवी नंतरचे पदव्यूत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून)- अर्ज करावयाचा कालावधी दि.१ ते १७ ऑगस्ट, अर्ज छाननी - दि.१८ ते २१ ऑगस्ट, पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम व प्रसिद्ध करणे दि.२२ ऑगस्ट, पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत दि.४ सप्टेंबर, रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिद्ध करणे दि. ५ सप्टेंबर, दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची अंतिम मुदत दि.१५ सप्टेंबर पर्यंत राहील.

शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर योजनेसाठी पात्र असणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी htts:hmas.mahait.org शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज भरावे असे आवाहन सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण दत्तात्रय वाघ यांनी केले आहे.

# वैजापूर येथे पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी यांनी केले अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त येथील साठे यांच्या पुतळ्याला शुक्रवार (ता. १) रोजी पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत (राजपूत) यांनी व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी ठा. धोंडीराम सिंह राजपूत यांनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या समयी त्यांच्या समवेत स्वच्छता सहाय्यक स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन, श्री. बागुल तसेच अण्णा भाऊ साठेनगरचे उत्सव समिती कार्यकर्ते, एल.एस. प्रतिष्ठाण व लहुजी वारिअर्स



या उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. वरील तिन्ही समिती सदस्यांनी बिघोत यांचे आभार व्यक्त केले.

# गोकुळाष्टमीनिमित्त राज्यातील १.५० लाख गोविंदांना विमा संरक्षण

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - गोकुळाष्टमी अर्थात दहिहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अत्यंत महत्त्वाचा सण असून या उत्सवात राज्यातील हजारोत युवक-युवती 'गोविंदा' म्हणून थरावर थर रचत हंडी फोडण्यासाठी सहभागी होतात. मात्र गेल्या काही वर्षांत सरावादरम्यान आणि प्रत्यक्ष उत्सवाच्या दिवशी अनेक अपघात घडले असून, अनेक गोविंदांना दुखापतींचा सामना करावा लागतो.

गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विमा संरक्षण मिळावे म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यंदा राज्यातील सुमारे १.५० लाख गोविंदांना 'गोविंदा समन्वय समिती (महा.)' या नियोजन समितीच्या माध्यमातून 'ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी' चे विमा संरक्षण देण्यात येणार आहे.

गेल्या वर्षी १.२५ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र, काही गोविंदा त्यापासून वंचित राहिले. यंदा ही त्रुटी दूर करत विमा कवचाची मर्यादा वाढवून १.५० लाख गोविंदांपर्यंत हे संरक्षण पोहोचवले जाणार आहे. यावर्षी राज्यभरातील अंदाजे १.५० लाख गोविंदांना विमा संरक्षण प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत 'दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई' या कंपनीचा प्रस्ताव शासनाने मान्य केला आहे. महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्यामार्फत आवश्यक कागदपत्रे सादर करून विमा रकमेचा खर्च शासनाकडून अदा केला जाणार आहे. क्रीडा व युवक सेवा विभाग, मुंबई यांना या संदर्भात सुसंवाद आणि आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

एकूण एक कोटी बारा लाख ५० हजार रुपये इतक्या रकमेचा विमा प्रस्ताव अंतिम करण्यात आला आहे. त्यानुसार उप सचिव (सुनील पांढरे) यांच्या स्वाक्षरीने जारी केलेल्या शासन आदेशानुसार संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही करून गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी ही योजना तत्काळ राबवावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित अभिवादन करण्यात आले.

चांदणे चौक येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उप आयुक्त तथा विभाग प्रमुख लखीचंद चव्हाण,संजय सुरडकर,माहिती व जनसंपर्क विभागाचे अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, इंझमाम उल हक आदींची उपस्थिती होती.

# सकल चर्मकार समाजाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना विन्रम अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - सकल चर्मकार समाजाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी सोनटक्के रविदास महाराज केंद्रीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष होते.

या वेळी मंचावर जवाहरलाल भगुरे, विनोद पुर्भे, ॲड. संतोष मिमरोट, संतोष लोखंडे, सी.एम. रमणे, महादेव डांबरे, राजू डोंगरे, अशोक बन्सवाल, प्रवीण बोर्डे, ॲड. गोरे, आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि क्रांतिकारी कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारसरणीवर भाषणे झाली आणि समाजात त्यांनी जागवलेली चेतना आजही कशी प्रेरणादायी आहे. यावर वक्त्यांनी भर दिला. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती कार्यक्रमास भरघोस प्रतिसाद दिला.

# वैजापूरात सर्व क्षेत्रातील नागरिकांच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्ताने येथील अण्णाभाऊ साठेनगर जयंती उत्सव समिती एल.एस. प्रतिष्ठाण व लहुजी वारीअर्स जयंती उत्सव समिती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवार (ता.०१) रोजी लाडगाव चौफुली परिसरात असलेल्या लोकशाहीर - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ एकत्र येत सामुदायिकपणे अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव साजरा केला.

या तिन्ही मंडळाच्या सदस्यांनी शहर व परिसरातील सर्वच क्षेत्रात कार्य करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांना अभिवादन साठी निमंत्रित केले .सकाळी साडे दहा वाजता अभिवादन कार्यक्रम आरंभ झाला या प्रसंगी.प्रथम माजी नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, डॉ. राजीव डोंगरे, प्रकाश चव्हाण, पंकज ठोंबरे, शैलेश चव्हाण, गणेश खैरे, अकिल शेख, बबन त्रिभुवन, मधु त्रिभुवन, वसंत त्रिभुवन, अल्ताफ बाबा, सोनू राजपूत, दिनेश राजपूत, विनोद राजपूत, पारस घाटे, विशाल संचेती, हाजी इम्रान कुरेशी, श्रीकांत साळुंके, दिलीप अनर्थे, आबा जेजुरकर, अण्णा ठेंगडे, हिकमतउल्ला, चांगदेव उघडे, सामाजिक कार्यकर्ते ठा. धोंडीरामसिंग राजपूत, ज्ञानेश्वर टेके, तसेच शहरातील सर्वच थरातील मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल आ.रमेश पा,पाटील बोरनारे यांनीही भेट देऊन अभिवादन केले. अण्णाभाऊसाठे नगर,एल.एस. प्रतिष्ठाण, व लहुजी वारिअर्स यांनी सर्वांचे आभार मानले.

# सहकार पुरस्कार प्रस्ताव दि.१८ ऑगस्टपर्यंत मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - सहकार विकासासाठी भरीव योगदान देणाऱ्या सहकारी संस्थाना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सहकार महर्षी पुरस्कार - १, सहकार भूषण - २१, सहकार निष्ठ -२३ अशा एकूण ४५ संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहे. मराठवाडा विभागातील सर्व सहकारी सुतगिरणी, हातमाग-यंत्रमाग सहकारी संस्थांनी आपले सहकार पुरस्कार प्रस्ताव संस्थेचे मुख्यालय असलेल्या तालुक्याच्या संबंधित सहायक, उपनिबंधक यांचेकडे सोमवार दि.१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे असे आवाहन प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग प्रशांत सदाफुले यांनी केले आहे.

# ज्ञान संदीप शिक्षण संस्थेतर्फे लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉक्टर आंबेडकर नगर, सिडको एन-७, छत्रपती संभाजीनगर येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे, सचिव. संगीता खिल्लारे, मुख्याध्यापक संदीप सोनवणे हे उपस्थित होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन



करण्यात आले. त्याचबरोबर सर्व शिक्षकांनी देखील प्रतिमांची पूजन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनात घडलेल्या आणि छोटे मोठे किसे विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचबरोबर लोकमान्य टिळक यांच्या विषयी देखील माहिती सांगितली. तसेच मुख्याध्यापक. संदीप सोनवणे यांनी इंग्रजांविरुद्ध लोकमान्य टिळकांनी कशा पद्धतीने संघर्ष केला हे विद्यार्थ्यांना सांगितले तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दल देखील मार्गदर्शन केले. शाळेतील इयत्ता पहिली ते दहावी या सर्व वर्गातील दोन -दोन विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शिक्षकांमधून संजीव चौधरी व वैशाली बागुल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनील चौधरी, संजीव चौधरी, नजमा खान, विजय पाटील, साहेबराव शिंदे, हर्षल पगारे, वैशाली बागुल, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीची विद्यार्थिनी मोनिका मगरे तिने केले तर आभार खुशी बनकर या विद्यार्थ्यांनी मानले.

# शिवराणा वाचनालय व नागरी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने शाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - थोर साहित्यिक, विचारवंत, कवी, लेखक शाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम शिवराणा वाचनालय व नागरी विकास सेवाभावीसंस्था तसेच शिवराणा सेवा संघ वतीने आयोजित कार्यक्रमात अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रकाश सोनवणे व वसंत पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी सुत्रसंचलन व प्रस्तावना एल.डी. ताटू यांनी केली. थोर साहित्यिक विचारवंत अण्णा भाऊ साठे लेखक, शाहिर, कवी, विचारवंत साहित्यिक, चळवळ चळवळीतील नेते, डॉ आंबेडकर यांच्या विचार सरणी वाटेगावकर मुंबईत येऊन कलावंत कला सादरीकरण शेख अमर बरोबर कलापथक साहित्यिक कथा, कादंबरी नाटक, प्रवास वर्णन, कविता संग्रह प्रकाशित महाराष्ट्र संयुक्त चळवळ चळवळीतील सहभागास प्रमुख होते. दिड दिवस शाळेत गेले तसं असुरक्षित पण सातासमुद्रापार भरारी घेतली. रशियामध्ये साहित्य कला पोहोचली. या वेळी प्रकाश सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात साहित्य थोर साहित्यिक विचारवंत कवी यांची अजरामर फकीरा कादंबरी वाचावी महान साहित्य दर्शन वैचारिक क्रांती घडवली. यावेळी संयोजक उपस्थित एल.डी. ताटू, सुर्यकांत तुपकर, कारभारी उगले, प्रकाश देशमुख, आर.डी. पवार, सुभाष काथार, राजेश मोरे, संदिप राजपुत उपस्थित होते.

# पहिलं लुक आउट : ॲक्शन ड्रामा आणि कश्यप-शैलीचा जबरदस्त तडका

**ॲमेझॉन** एमजीएम स्टुडिओज इंडिया प्रस्तुत 'निशांची' - एक रोमांचकारी क्राईम ड्रामा पहिलं पोस्टर प्रदर्शित ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओज इंडिया यांनी त्यांच्या आगामी थियेट्रिकल फिल्म 'निशांची' चं बहुचर्चित आणि प्रभावी फर्स्ट लुक पोस्टर आज प्रदर्शित केलं आहे. जार पिक्चर्सच्या अजय राय आणि रंजन सिंग यांच्या बॅनरखाली, फ्लिप फिल्म्सच्या सहनिर्मितीत तयार झालेली ही फिल्म एक सशक्त आणि थरारक क्राईम ड्रामा आहे, ज्याचं दिग्दर्शन अनुराग कश्यप यांनी केलं आहे.





'निशांची' या चित्रपटातून ऐश्वर्य ठाकरे अभिनय क्षेत्रात पदार्पण करत आहेत आणि विशेष बाब म्हणजे ते या चित्रपटात दुहेरी भूमिका साकारत आहेत.

अनुराग कश्यप यांच्या रॉ. देशी आणि रिअल स्टोरीटेलिंग शैलीतून साकारलेली ही कथा व्यावसायिक मसाला सिनेमाची चव देखील घेऊन येते. 'निशांची' ही दोन भावांची कथा आहे - दिसायला अगदी सारखे पण विचारांनी, मार्गांनी आणि निर्णयांनी एकमेकांपासून पूर्ण वेगळे. त्यांच्या निवडी त्यांचं नशीब ठरवतात, आणि त्यांची कहाणी प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारी आहे. या चित्रपटात ऐश्वर्य ठाकरेसोबत वेदिका पिंटो, मोनिका पंवार, मोहम्मद झीशान अय्यूब आणि कुमुद मिश्रा यांसारखे दमदार कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये झळकणार आहेत.

'निशांची' १९ सप्टेंबर २०२५ रोजी संपूर्ण भारतात थेट सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचं फर्स्ट लुक पोस्टर पारंपरिक भारतीय सिनेमाची खरीखुरी झलक दाखवतं - बोल्ड, अनेक स्तरांमध्ये गुंतलेली आणि जबरदस्त ड्राम्याने भरलेली कहाणी. रंगांची उधळण, भावनांचा प्रचंड आवेग आणि प्रेम, सूड व नियती यांचं एकमेकांशी होणारं टकराव या चित्रपटाच्या पोस्टरमधूनच जाणवू लागतं. या कथेच्या केंद्रस्थानी आहेत ऐश्वर्य ठाकरे, जे या चित्रपटात जुळ्या भावांची दुहेरी भूमिका साकारत आहेत. हे दोघं भाव एकाच चेहऱ्याचे असले तरी त्यांच्या आयुष्यातील मार्ग भिन्न आहेत. मात्र, दोघेही अशा एका वादळात अडकतात जे कोणत्याही क्षणी फुटून निघू शकतं. 'निशांची' हा एक असा सिनेमा आहे जो दमदार पार्श्वसंगीत, भारावणारे दृश्य, खोल भावनांचा स्पर्श आणि उच्च स्तराच्या नाट्याने भरलेला आहे. ही फिल्म केवळ एक कहाणी नसून सिनेमॅटिक रोलरकोस्टर आहे, जी केवळ मोठ्या पडद्यावरच अनुभवता येईल. ही जबरदस्त आणि हृदयाला भिडणारी कथा अजय राय आणि रंजन सिंग यांनी जार पिक्चर्स अंतर्गत, फ्लिप फिल्म्ससोबत मिळून निर्माण केली आहे. चित्रपटाची कहाणी प्रसून मिश्रा, रंजन चंदेल आणि अनुराग कश्यप यांनी संयुक्तपणे लिहिलेली आहे. तर, १९ सप्टेंबरला सज्ज व्हा्ढगोळ्यांची थरथर, फसवणूक आणि बंधुभाव अनुभवण्यासाठी! 'निशांची' येतेय एक भेदक, तगडी आणि अविस्मरणीय कहाणी घेऊन.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# महसूल दिन कार्यक्रम; कर्तव्य बजावतांना समाजसेवाही करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी






छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- महसूल विभागाचा संपर्क हा समाजातील सर्व घटकांशी येतोच. जीवनाचा असा एकही भाग नाही की जो महसूल विभागाशी संबंधित नसतो. त्यामुळे महसूल विभागाचे कर्मचारी म्हणून आपण सर्व समाजघटकांशी विनम्रतेने वागले पाहिजे. महसूल कर्मचाऱ्यांनी नोकरीचे कर्तव्य बजावत असतांना सामाजिक उपक्रमात सहभाग घेऊन समाजसेवाही करा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

छत्रपती संभाजीनगर उपविभागामार्फत महसूल दिन कार्यक्रमाचे आयोजन आज जिल्हाधिकारी कार्याल यातील नियोजन सभागृहात करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसिलदार कैलास वाघमारे, अपर तहसिलदार डॉ. परेश चौधरी आदी उपस्थित होते.

उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांना यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. नायब तहसिलदार सतीश भदाणे, मंडळ अधिकारी कल्याण वानखरे, सहा. महसूल अधिकारी श्रीधर दांडगे, ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल शेळके, महसूल सहायक श्रीमती शोभा टाक, वाहन चालक एम.एम. शेख, शिपाई समीर शेख, महसूल सेवक अण्णा जाधव या कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. सर्व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कार्य करुन जनतेस सेवा द्यावी. आपले कर्तव्य हे जनतेला सेवा देणे हे असून ही सेवा विनम्रतेने दिली जावी. अद्यावत तंत्रज्ञानाचा अंगिकार करुन सेवेचा दर्जा उंचवावा,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनीही कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. प्रास्ताविक डॉ. व्यंकट राठोड यांनी केले. रघुनाथ शेळके यांनी आभार मानले.

# लोकमान्य टिळक आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भाजपतर्फे आदरांजली



पुणे दि.१ (प्रतिनिधी)- थोर क्रांतिकारक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १०५ व्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहर भाजपने त्यांना विनम्र अभिवादन केले. १ ऑगस्ट रोजी मोरवाडी येथील पक्ष कार्यालयात आयोजित कार्यक्रमात दोन्ही महान विभूतींच्या कार्याला आदराने स्मरण करण्यात आले.

शहर भाजपचे अध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी टिळक आणि साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना काटे म्हणाले, 'लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' अशी गर्जना करून स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. त्यांचे राष्ट्रप्रेम आणि दूरदृष्टी आजही आपल्याला प्रेरणा देते.'

पुढे ते म्हणाले, 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने आणि शाहिरीने समाजातील उपेक्षित आणि वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यांच्या लेखणीतून उमटलेला सामाजिक चळवळीचा आवाज आजही महत्त्वाचा आहे.' या दोन्ही महान नेत्यांनी आपापल्या क्षेत्रातून जनतेला जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असून, आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, विठ्ठल भोईर, सुरेश भोईर, उत्तम केंदळे, उपाध्यक्ष कैलास सानप, बबन डांगले, भारती चव्हाण, अरुण चाबुकस्वार, राजाभाऊ मासुळकर, गणेश वाळुंजकर, जयेश चौधरी, संतोष सिंग, प्रविण कुंजीर, बाळकृष्ण परघळे, सीमाताई चव्हाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृत्रिम वाळू धोरणाची अंमलबजावणी; इच्छुकांना सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- शासनाने दि.२३ मे च्या शासन निर्णयानुसार कृत्रिम वाळू अर्थात एम सॅन्ड धोरण निश्चित केले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धतीही निश्चित करण्यात आली आहे. तथापि, जिल्ह्यातील खाणपट्टाधारक, क्रशर उद्योग करणाऱ्यांनी एम सॅन्ड युनिल लावण्याच्या लिल ावात सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

या धोरणानुसार एम सॅन्ड युनिट ल ावण्यासाठी शासकीय वा सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहीत असलेल्या जमिनींबाबत व खाजगी जमिनींबाबत असे दोन प्रकारात नियमावल ी निश्चित करण्यात आली आहे.

शासकीय व सार्वजनिक प्राधिकरणाकडील जमिनींसंदर्भात जिल्हा निहाय अशा जमिनींची माहिती एकत्र करुन त्यात खाणपट्टा देण्यासाठी आवश्यक विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन लिलावा योग्य जमिनींची माहिती 'महाखनिज' या संगणक प्रणालीवर अपलोड केली जाईल.सगळ्यात जास्त बोलीनुसार ५ एकर पर्यंतच्या क्षेत्रासाठी लिलाव कार्यवाही केली जाईल. त्यात लिलावधारकांना एम सॅन्ड युनिट बसविण्याबाबतचे हमीपत्र घेण्यात येईल. गौण खनिज अवैध उत्खनन, वाहतुकीत दोषी आढळलेल्या व्यक्तिंना लिलावात सहभाग घेता येणार नाही.

आवश्यक कागदपत्रे- एम सॅन्ड युनिट साठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक प्रमाणपत्रे, एम सॅन्ड युनिट वापर अनुज्ञेयाबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, आवश्यक तेथे अकृषिक परवानगी आदेश, आधार नोंदणी, जिल्हा उद्योग केंद्र नोंदणी प्रमाणपत्र इ.

शासनाच्या मान्यतेनंतरच जिल्हाधिकारी यांच्याकडून खाणपट्टा निष्पादनाची कार्यवाही करण्यात येईल.


खाजगी जमिनींसंदर्भात संबंधित अर्जदार यांनी गाव नमुना नंबर, सातबारा, आधारकार्ड, पॅ नकार्ड, अर्ज फी इ. कागदपत्रासह महाखनिज या प्रणालीवर शासनाकडे अर्ज करावा.पुर्व मान्यतेची कार्यवाही करण्याचा कालावधीत तीन महिन्याचा आहे.

आवश्यक कागदपत्रे- एम सॅन्ड युनिट साठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक प्रमाणपत्रे, एम सॅन्ड युनिट वापर अनुज्ञेयाबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, आवश्यक तेथे अकृषिक परवानगी आदेश, आधार नोंदणी, जिल्हा उद्योग केंद्र नोंदणी प्रमाणपत्र इ. अधिक माहितीसाठी, जिल्हा खनिकर्म शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरपोच सेवा देणार 'सेवादूत'; नागरिकांना सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे डिजीटल पाऊल

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- नागरिकांना विविध प्रकारचे दाखले, सेवा शासनामार्फत घ्याव्या लागतात. ह्या सेवा आता नागरिकांना घरबसल्या मोबाईल ॲपद्वारे दिल्या जाणार आहेत. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने 'सेवादूत' हे मोबाईल ॲप तयार केले आहे. आज हे ॲप जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते लोकांच्या सेवेत रुजू करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्याल यात आज हे मोबाईल ॲप रुजू करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी डॉ.




सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक शरद दिवेकर आदी यावेळी उपस्थित होते.

शरद दिवेकर यांनी सांगितले की, सेवादूत हे ॲप जिल्हा प्रशासनाने तयार केले आहे. याॲपद्वारे महाऑनलाईन मार्फत दिल्या जाणाऱ्या ८५८ सेवा देता येतील, अशी याची रचना आहे. प्लेस्टोअरवर जाऊन नागरिकांनी हे ॲप डाऊनलोड करावे. तेथे बुक अपॉईंटमेंट करुन आपली नोंदणी करावी. ही नोंदणी आधार क्रमांक, मोबाईल क्रमांकासह करता येईल. त्यानंतर ते आपल्याला हव्या त्या सेवेचा तपशिल दिल्यानंतर ही माहिती जिल्ह्याच्या डेटासेंटरकडे पाठविली जाईल. तेथून ती माहिती नागरिकांच्या नजिकच्या सेवा केंद्राकडे अग्रेषित केली जाईल. संबंधित सेवाकेंद्र चालक हे त्या नागरिकाच्या घरी जाऊन त्यांना हव्या असल ेल्या सेवेसाठी आवश्यक कागदपत्रे प्रत्यक्ष पाहून स्कॅ न करुन अपलोड करेल व त्यानंतर विहित कालावधीत संबंधित नागरिकास सेवा घरपोच दिली जाईल. या सेवेसाठी नागरिकांना १०० रुपये अतिरिक्त आकारले जाणार आहे. ही सेवा ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, अथवा आजारी नागरिकांना अधिक उपयुक्त ठरेल,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी नागरिकांना अधिकाधिक सेवा डिजीटल स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून आणखीन काही सुविधा नागरिकांना देण्यात येतील. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमाचा भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी-प्रा.डॉ.बाळासाहेब लिहिणार

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारे असुन त्यांच्या साहित्यातून स्त्री पहिल्यांदा नायिका म्हणून अस्तित्वात आली भारतीय साहित्याने स्त्रीला कधीच नायिका न करता ती केवळ साहित्य कृतितील पात्र ठरत होती अण्णाभाऊनी याला छेद दिला आणि एखाद्या साहित्यकृतीची स्त्री नायिका असू शकते हे दाखवून दिले. असे प्रतिपादन डॉ.बाळासाहेब लिहिणार यांनी केले. ते करमाड येथील राजीव गांधी कला आणि वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती निमित्त बोलत होते. यावेळी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी निमित्त प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

अण्णाभाऊची नायिका हातात सुरा, कुऱ्हाड, तलवार घेऊन बंड करताना दिसते. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे कामगार चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व होते. समाजातील दलित, शोषित आणि उपेक्षित घटकांना न्याय देण्याचे काम त्यांनी त्यांच्या साहित्यातून केले अशी भूमिका त्यांनी मांडली. आजच्या तरुण विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे यांचे जीवनकार्य प्रेरणादायी ठरते याचाही उल्लेख त्यांनी केला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.मुळे यांनी अध्यक्ष समारोप करताना विदयार्थ्यांनी अण्णाभाऊ यांचा संघर्ष लक्षात घेत वाटचाल करावी असा संदेश दिला. याप्रसंगी प्रा.मनोज देवकर यांनी देखील अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर व विविध चळवळींवर प्रकाश टाकला. यावेळी विद्यार्थांनी सक्रीय सहभाग घेतला. या प्रसंगी सुरुवातीला प्रस्ताविकामध्ये डॉ. कालिदास फड यांनी लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करुन आपल्या भावना व्यक्त करताना प्रत्येक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करावे असे सांगीतले.

या कार्यक्रमासाठी आ य.क्यु.एस.सी समन्वयक डॉ.नरेश डहाळे यांची प्रमुख ऊपस्थिती होती. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.किशोर काळे आणि आभार डॉ.रमेश कचरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दैनिक लोकविजय
**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGING MY NAME FROM
**OLD NAME -** A. WAHEED A. HAKEEM
**NEW NAME -** ABDUL WAHEED ABDUL HAKEEM
AS PER MY DOCUMENTS
**ADD :** BESIDE AYESHA MASJID PLOT NO 33/P CHAUS COLONY HIMAYAT BAAGH URANGABAD MAHARASHTRA-431001

दैनिक लोकविजय
**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGING MY NAME FROM
**OLD NAME -** A. HAKEEM A. SATTAR
**NEW NAME -** ABDUL HAKEEM ABDUL SATTAR
AS PER MY DOCUMENTS
**ADD :** BESIDE AYESHA MASJID PLOT NO 33/P CHAUS COLONY HIMAYAT BAAGH URANGABAD MAHARASHTRA-431001

दैनिक लोकविजय
**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGING MY NAME FROM
**OLD NAME -** 1) PATHAN FAHEEMULLA KHAN BARKATULLA KHAN
2) FAHIMULLA KHAN
**NEW NAME -** PATHAN FAHEEMULLA KHAN
AS PER MY DOCUMENTS
HOUSE NO.8-17-183 LANE NO 12/B,CENTER NAKA ROAD NEAR TAKALKAR SOCIETY BARI COLONY, AURANGABAD, MAHARASHTRA 431001

## (पान १ वरुन)

### भारत-रशिया दोन्ही देश स्थिर..

परिस्थितीवर लक्ष ठेवतो. अलिकडच्या काही महिन्यांत रशिया भारताचा सर्वात मोठा तेल पुरवठादार राहिला आहे. भारताच्या आयातीमध्ये त्याचा वाटा सुमारे ३५-४० टक्के आहे, जो युक्रेन युद्धापूर्वी फक्त ०.२ टक्के होता. यावर भाष्य करताना ट्रम्प म्हणाले होते की, भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवावे, कारण यामुळे रशियाला युक्रेन युद्धात फायदा होत आहे. यावरच बोलताना त्यांनी दोन्ही देशांची अर्थव्यवस्था मृत असल्याची टीका केली होती. मात्र, आता भारताने अमेरिकेच्या टीकेला थेट प्रत्युत्तर दिले आहे.

### दौंडच्या यवतमध्ये दोन गटात...

झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक हाणामारीत झाले होते. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि अतिरिक्त सुरक्षा दल तैनात केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बाबत दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. तसेच नागरिकांनी शांतता राखण्याचे आवाहन देखील त्यांनी केले.

परिस्थिती नियंत्रणात असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं आहे. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहनही अजित पवार यांनी नागरिकांना केलं आहे. मी नागरिकांना सांगू इच्छितो की यवतमधील परिस्थिती पोलिसांनी पूर्णपणे नियंत्रणात आणलेली आहे. या घटनेनंतर कोल्हापूरवरून वरिष्ठ पोलीस अधिकारी देखील दाखल झाले आहेत. जिल्ह्याचे पोलीस प्रमुख देखील या ठिकाणी आहेत. सध्या सर्व परिस्थिती आटोक्यात आहे', असं अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

### भाजपमध्ये जाण्यासाठी किती...

पाठीमागे कोण आहे त्यांना काही दिवसांनी आम्ही उघड करु. हे स्थानिक षडयंत्र आहे, स्थानिक लोकांनीच त्यांना उचकवलं आहे.. माझ्याकडे त्याच्या भावाची रेकॉर्डिंग आहे. तो आई बद्दल बोललेला आहे, त्यांने आईला किती यातना दिल्या, याची माझ्याकडे क्लिपआहे ती योग्य वेळी काढू असे खोतकर म्हणाले.

### करून भागले अन् देवपूजेला लागले

परवाना परत करतात. अशा गृहराज्यमंत्र्यांकडून कायदा व सुव्यवस्था काय राखली जाईल, जे स्वतःच कायदा, सुव्यवस्था पाळत नाहीत. डान्सबार व्यवसाय करणाऱ्यांवर यांचा काय धाक राहणार ? या गृहराज्यमंत्र्यांने लायसेन्स रद्द केले म्हणजे क्लिनचीट मिळाली ? मंत्रिपदावर राहून त्यांनी पदाचा अपमान केला आहे. त्यामुळे गृहराज्यमंत्री कदम यांचा राजीनामा झालाच पाहिजे, असे ते म्हणालेत.

कदम यांची या प्रकरणातून सुटका होणार नाही. कायद्याने गुन्हा घडला आहे. ज्या गोष्टीवर महाराष्ट्रात बंदी आहे, ती त्यांच्या घरात सुरू होती. त्यामुळे या प्रकरणातून गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची सुटका होऊ शकत नाही, असेही अनिल परब यावेळी कदमांवर शरसंधान साधताना केली होती.

### लवकरच एसटीचे रिटेल इंधन...

सध्या २५१ ठिकाणी एसटीच्या स्वतः च्या जागेवर पेट्रोल पंप उभारले असून या द्वारे केवळ एसटीच्या बसेस साठी डिझेल इंधनाचे वितरण होते. अर्थात , पेट्रोल पंप चालवणे आणि त्याचे देखभाल करण्याचा उत्तम अनुभव एसटी महामंडळाच्या पाठीशी आहे. त्यामुळे भविष्यात केंद्र सरकारचे सार्वजनिक उपक्रम असलेल्या इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या ऑइल विक्री करणाऱ्या कंपन्यांशी व्यावसायिक करार करून सर्वसामान्य ग्राहकांसाठी पेट्रोल आणि डिझेल व तत्सम इंधन विक्री करणारे पंप उभा करणे प्रस्तावित आहे.

असे पेट्रोल पंप हे रस्त्यालगत व व्यावसायीक दृष्ट्या मोक्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यभरातील एसटी महामंडळाच्या स्वतःच्या ज्या जागा आहेत, त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून अशा २५ बाय ३० मीटर जागा निश्चित करण्यात येत आहेत. या ठिकाणी एसटी महामंडळाचे केवळ इंधन विक्रीच नाही तर रिटेल शॉ प देखील उभारले जाणार आहेत. त्यामुळे येथे इतर व्यवसायाला देखील पूरक संधी उपलब्ध होईल! यातून एसटी महामंडळाला सार्वजनिक भागीदारीत चांगला महसूल देखील मिळू शकतो.

### कंगना रणौतला पंजाब आणि....

हानी पोहचली आणि त्यांच्या स्वतःच्या तसेच इतरांच्या नजरेत देखील त्यांची प्रतिष्ठा कमी झाली. त्यामुळे त्यांच्या हक्कांच्या समर्थनात अशी तक्रार दाखल करणे हे वाईट भावनेने केल्याचे म्हणता येणार नाही.''

भटिंडा जिल्ह्यातील बहादुरगड जांदियान गावातील महिंदर कौर (७३) यांनी कंगनावर मानहानीचा खटला दाखल केला होता. नंतर डिलीट केलेल्या एका ट्विटमध्ये कंगनाने कौर यांचा फोटो शेअर केला होता. तसेच ट्विट केले होते की अशा महिलांना १०० रुपयांत आंदोलनसाठी आणले जाऊ शकते.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**
**3rd call**

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco ETendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| S.N. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Work of Augmentation by replacement of existing 132/33kv 2x25 MVA TF by 132/33kv 2x50MVA power transformer at 132kv Ardhapur ss under CSN Zone | SE/EHVC/PV/TS/2025-26/T-09 | 7000036813 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:** The Executive Engineer (O): Phone No. (02446)222076.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Parli-V.**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) for following Tender Available at: **http://srmetender, mahatransco.in** due date for online submission: **02.08.2025, 00:01 hr to 16.08.2025, 23:59 hrs.**

| S.N. | Tender No. & Description |
|---|---|
| 1 | **RFx No. 7000037195** 1st Call for the SRM Tender for Annual Maintenance Contract for the Work of Providing of Hydra Crane Services (14 MTon Farana Type Crane) for Preventive Maintenance as and when required at 765kV RS Division Ektuni. Of Tender amount limited to **Rs. 10,00,000/-** EMD: **Rs. 10,000/-** Tender Fees: **Rs. 590/-** |

**Contact Person:** DyEE (Office) 765 kV Ektuni S/s -
Contact No.: **8554994585**

**Sd/-**
**Executive Engineer**
**765 kV RS Division, Ektuni**